साँकेतांक क्र 19990604122

२५८०

अ. भू. अ. सातारा

९०००

क्रमांक: कॉन/एस.आर.३४/१२७/९९.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, म.राज्य.यांचे कार्यालय.
नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉल समोर.
पुणे, दिनांक: ४/६/१९९९.

8 JUN 1999

प रि प त्र क
===========

विषय:- जमीन एकत्रीकरण योजना.
==============================
अपील प्रकरणात अनुसरावयाची कार्यपध्दत.

जमीन एकत्रीकरण योजनेचे काम सुरु असताना सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी फेरफार नोंद मंजूर करुन अभिलेख दुरुस्त केलेला असेल अशा प्रकारच्या तक्रार अर्ज प्रकरणात अधीक्षक भूमि अभिलेख संवर्गातील अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २४७ अन्वये अपील चालवून निर्णय द्यावा अशा सूचना इकडील परिपत्रक क्रमांक कॉन/एस.आर.१२७/क:१/८८, दिनांक २६.१२.८८ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. पण असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २५१ च्या तरतुदी प्रमाणे अपील प्राधिकारी:हे विलंब क्षमापन( condonation of delay ) बाबत कोणतीही कार्यवाही न करताच अशा प्रकरणात निर्णय देत असतात. ही कार्यवाही नियमानुकूल नाही.

२. सबब याव्दारे अशा सूचना देणेत येत आहे की, वरील परिच्छेद १ मध्ये नमूद प्रकरणाबाबत अपील प्राधिकारी यांनी सर्व प्रथम महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २५१ नुसार विलंब क्षमापनची कार्यवाही करावी व तद्नंतर प्रकरणाच्या गुणावगुणावर सुनावणी होवून निर्णय द्यावा.

३. वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केलेली प्रकरणे जर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २४७ खाली होतली नसल्यास अशा प्रकरणी इकडील परिपत्रक क्रमांक:कॉन/एल.आर.३४/क:१/९० दिनांक २०.१.९० अन्वये सूचना दिलेप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २५७ च्या तरतूदीनुसार हाताळता येईल.

४२३८

१६।६।९९

३३६

..२

वरील सूचनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

स्वाक्षरी/-xxxxx
जमाबंदी आयुक्त आणि
संचालक भूमि अभिलेख.

प्रत/- उपसंचालक भूमि अभिलेख[सर्व]/जमाबंदी उप आयुक्त [सर्व]

प्रत/- अधीक्षक भूमि अभिलेख[सर्व]/प्राचार्य भूमि अभिलेख प्रशिक्षण शाळा, औरंगाबाद.

प्रत/- कार्यालय अधीक्षक ए:१, ए:२, व ए:३ जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालय.

प्रत/- स्वीय सहाय्यक, जमाबंदी आयुक्त कार्यालय.

" नि र्ग मि त "

५.६.९९

जमाबंदी उप अधियुक्त.

दाक्षेत्री/-३६९९.